## संक्षिप्त

### एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा पुढे ढकलली

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** इन्स्टिट्यूशन ऑफ ॲग्रिकल्चरल टेक्नॉलॉजिस्ट (आयएटी) पुणेच्या वतीने औरंगाबाद येथे शनिवारी (ता. १८) आयोजित एकदिवसीय कार्यशाळा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती आयएटीच्या वतीने डॉ. शाळीग्राम वानखेडे यांनी दिली. औरंगाबादमधील इस्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर, रेल्वे स्टेशन रोड सभागृहात 'गटशेतीद्वारे गुणवत्तापूर्ण कृषी उत्पादन, मूल्यवृद्धी, पणन व निर्यात' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. परंतु माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनामुळे ही कार्यशाळा पुढे ढकलण्यात आली आहे. पुढील तारीख यथावकाश जाहीर करण्यात येईल, असेही वानखेडे यांनी कळविले आहे.

# मराठवाड्यात दुसऱ्या दिवशीही दमदार पाऊस

## १८९ मंडळात ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक; पहिल्यांदाच नदी, नाले खळखळून वाहिले

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** मराठवाड्यातील ४२१ महसूल मंडळांपैकी तब्बल १२१ मंडळात शुक्रवारी (ता. १७) सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत ६५ मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला. सलग दुसऱ्या दिवशी मराठवाड्यात सर्वदूर पावसाचा कमी अधिक प्रमाणात जोर कायम होता. शुक्रवारी (ता. १७) सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत मराठवाड्यातील ४२१ मंडळात सरासरी ६५.४८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या पावसामुळे गुरुवारी (ता. १६) सायंकाळनंतर पहिल्यांदा काही नद्यांना पूर तर नदी नाल्यांना पाणी वाहल्याचे चित्र मराठवाड्यात पहायला मिळाले.

मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील ६५ पैकी ५४ मंडळात ६५ मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली.



**लासूर स्टेशन, जि. औरंगाबाद : परिसरातून वाहणारी शिवना नदी पहिल्यांदा दुथडी भरून वाहू लागली आहे. छायाचित्र : अविनाश संगेकर.**

### ८६ मंडळात १०० मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस

**मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना बीड, नांदेड, परभणी, हिंगोली आदी जिल्ह्यांतील ८६ मंडळात १०० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंदल्या गेला. औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेड जिल्ह्यांतील १४ तालुक्यांत सरासरी १०० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील चार, जालना जिल्ह्यांतील पाच, परभणी जिल्ह्यातील एक व नांदेड जिल्ह्यातील चार तालुक्यांचा समावेश आहे. कन्नड तालुक्यातील करंजखेडा मंडळात २०४ मिलिमीटर, खुलताबाद तालुक्यातील बाजारसावंगी मंडळात २१७ मिलिमीटर, परतूर तालुक्यातील आष्टी मंडळात २११ मिलिमीटर तर माहूर तालुक्यातील वाई मंडळात २३२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.**

शुक्रवारी सकाळपर्यंतच्या चोवीस तासांत मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील ४२१ मंडळांमध्ये सरासरी ६५.४८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यात सरासरी १०४.४१ मिलिमीटर, जालना जिल्ह्यात सरासरी ११३.६२ मिलिमीटर, परभणी जिल्ह्यात सरासरी ७२.८६ मिलिमीटर, हिंगोली जिल्ह्यात सरासरी ६५.९९ मिलिमीटर, नांदेड जिल्ह्यात सरासरी ७१.८६ मिलिमीटर, बीड जिल्ह्यात सरासरी ४३.८० मिलिमीटर, लातूर जिल्ह्यात सरासरी २६.९८ मिलिमीटर, तर उस्मानाबाद जिल्ह्यात सरासरी २४.९५ मिलिमीटर पावसाची नोंद घेतल्या गेली. शुक्रवारी सकाळी पावसाने उसंत घेतली होती.

# कृषी अधिकारी आणि तज्ज्ञांकडून पीक स्थितीची पाहणी

**गेवराई, जि. बीड (प्रतिनिधी) :** तालुक्यातील तळणेवाडी, पाढरवाडी रानमळा यासह तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांची पीक परिस्थितीची पाहणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यासह वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. अरुण गुट्टे यांनी केली.

या वेळी गेवराई तालुक्यात नगदी पीक म्हणून कापूस हे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. शेतकऱ्यांनी आत्तापासूनच बोंड अळीचे व्यवस्थापन शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी एम. एल. चपळे यांनी केले. पतंग जास्तीत जास्त अडकविण्यासाठी प्रति एकर आठ कामगंध सापळे लावून भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांचा वेळीचा बंदोबस्त करावा.



**गेवराई, जि. बीड : गेवराई तालुक्यातील पीकस्थितीची पाहणी करताना अधीक्षक कृषी अधिकारी चपळे व शास्त्रज्ञ डॉ. अरुण गुट्टे.**

या वेळी तालुका कृषी अधिकारी संदीप स्वामी, पंचायत समिती येथील कृषी अधिकारी अशोक राठोड, कृषी मंडळ अधिकारी संतोष घसिंग व अनेक गावांतील शेतकरी उपस्थित होते. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान होण्याचा अंदाजही या वेळी वर्तविण्यात आला.

# कृषी विभागाच्या वतीने पीरगैबवाडी येथे मार्गदर्शन

**जालना (प्रतिनिधी) :** बोंड अळीच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांना पीरगैबवाडी येथे नुकताच कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात बोंड अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्यात आली.

पीरगैबवाडी परिसरात कपाशीवर शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कीडीचे व्यवस्थापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात कृषी सहायक आर. जी. मोहिते यांनी बोंड अळीचा जीवनक्रम प्रादुर्भावाची कारणे ओळख नुकसानीचा प्रकार तसेच भौतिक जैविक व रासायनिक पद्धतीने व्यवस्थापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले.

तसेच डोमकळ्या कशा ओळखायच्या याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कीटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी यावरही सखोल मार्गदर्शन केले. या वेळी कृषी सहायक आर. जी. मोहिते, शेतकरी सिद्दिक पटेल, विष्णू भोयटे, किसन भोयटे, चंद्रकांत विखे यांसह अनेक शेतकरी उपस्थित होते.


सकाळ ॲग्रोवन आयोजित
फ्लेक्सो टफ — गुडविल पॉलीप्लास्ट, लातूर प्रायोजित
सकाळ ॲग्रोवन संवाद
'ॲग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
रविवार, १९ ऑगस्ट २०१८ रोजी
विषय – सोयाबीन व ऊस पीक व्यवस्थापन
वक्ते – प्रा. विजय भामरे (किटक शास्त्रज्ञ- कृषी महाविद्यालय, लातूर)
डॉ. वसंत सुर्यवंशी (विस्तार कृषी विद्यावेत्ता -विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्र)
श्री. सुनीलकुमार उपाध्याय (चेअरमन - गुडविल पॉलीप्लास्ट, लातूर)
स्थळ – खंडोबा मंदिर, मु. पो. निवळी, ता. जि. लातूर
वेळ – सकाळी ८ वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.


# मराठवाड्यात सोमवारी चर्चासत्रांचे आयोजन

**पुणे (प्रतिनिधी):** शेतीशी संबंधित नवतंत्रज्ञान शेतकऱ्यांना थेट बांधावर उपलब्ध व्हावे, या उद्देशाने 'ॲग्रोवन' आणि स्मार्टकेम टेक्नोलॉजीज लि. पुणे यांच्यावतीने सोमवारी (ता. २०) मराठवाड्यातील बीड, औरंगाबाद, जालना आणि उस्मानाबाद जिल्ह्यांत कापूस खत व कीडरोग व्यवस्थापन, कापूस पीक कीड व्यवस्थापन, कांदा लागवड व व्यवस्थापन या विषयांवर चर्चासत्रं चे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी या चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'ॲग्रोवन'च्यावतीने करण्यात आले आहे.

**चर्चासत्रांचे नियोजन असे**

**जिल्हा :** बीड
**दिनांक :** २० ऑगस्ट २०१८
**विषय :** कापूस खत व कीडरोग व्यवस्थापन
**वक्ते :** श्री. पी. पी. कुंभार (ता. कृ. आ. माजलगाव)
श्री. एकनाथ गुरव (जिल्हा प्रतिनिधी, स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज प्रा. लि.)
**स्थळ :** मारोती मंदिर सभागृह, मोठीवाडी, ता. माजलगाव, जि. बीड
**वेळ :** सकाळी ८ वाजता

**जिल्हा :** औरंगाबाद
**दिनांक :** २० ऑगस्ट २०१८
**विषय :** कापूस पीक कीड व्यवस्थापन
**वक्ते :** डॉ. किशोर झाडे (कृषी वि. केंद्र औरंगाबाद)
श्री. एच. टी. भिसे (झोनल मार्केटिंग मॅनेजर)
**स्थळ :** ग्रामपंचायत हॉल, महालगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद
वेळ : सकाळी ९ वाजता

**जिल्हा :** जालना
**दिनांक :** २० ऑगस्ट २०१८
**विषय :** कापूस खत व कीडरोग व्यवस्थापन
**वक्ते :** श्री. एस. बी. पवार (सहयोगी संचालक संशोधन तथा विस्तार कृषी विद्यावेत्ता, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प औरंगाबाद)
श्री. सुदर्शन सोनवणे (एरिया मार्केटिंग मॅनेजर, महाधन)
**स्थळ :** ग्रामपंचायत सभागृह, बाजार गेवराई, ता. बदनापूर, जि. जालना
वेळ : सकाळी ८:३० वाजता

**जिल्हा :** उस्मानाबाद
**दिनांक :** २० ऑगस्ट २०१८
**विषय :** कांदा लागवड व व्यवस्थापन
**वक्ते :** प्रा. सचिन सूर्यवंशी (कार्यक्रम समन्वयक, केव्हीके, तुळजापूर)
प्रा. गणेश मंडलीक (शास्त्रज्ञ, उद्यानविद्या केव्हीके, तुळजापूर)
प्रा. एस. पी. जाधव (तालुका कृषी अधिकारी, तुळजापूर)
**स्थळ :** सांस्कृतिक सभागृह, येवती, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद
वेळ : सकाळी ८:३० वाजता